# अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट

## जाहिरात

राज्यात कोरोना (कोविड- १९) विषाणुचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन उद्रेक सदृष्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकचे आरोग्य सेवा देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासू शकते. त्याची पूर्वतयारी म्हणून जिल्हास्तरावरून आरोग्य सेवा देण्यास सक्षम असणाऱ्या वैद्यकीय अधिकारी (MBBS) व वैद्यकीय अधिकारी (BAMS) यांना स्थानिक स्तरावरून आवाहन करून ऑनलाईन इच्छुक कर्मचाऱ्यांची यादी तयार करण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत.

त्यानुसार आरोग्य सेवा देण्यास सक्षम असणाऱ्या वैद्यकीय अधिकारी (MBBS) व वैद्यकीय अधिकारी (BAMS) या पदासाठी शैक्षणिक पात्रताधारक इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १) | वैद्यकीय अधिकारी (MBBS) | अक्कलकोट न. प.साठी- १ | MBBS,महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (MMC) कडे नोंदणी असावी व ती अद्ययावत असावी. | रु. ६०,०००/- एकत्रित मानधन प्रतिमहा |
| २) | वैद्यकीय अधिकारी (BAMS) | अक्कलकोट न. प. साठी- १<br>मैंदर्गी न. प. साठी- १<br>दुधनी न. प. साठी- १<br>एकूण- ३<br>मैंदर्गी न. प. साठी- १<br>दुधनी न. प. साठी- १<br>एकूण- ७ | BAMS महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन (MCIM) कडे नोंदणी केलेली असावी व ती अद्ययावत असावी. | रु. ३०,०००/- एकत्रित मानधन प्रतिमहा |

**सूचना :-**

१) उपरोक्त पदाकरिता दिनांक : २९/०७/२०२० ते दिनांक : ०४/०८/२०२० रोजी सकाळी १०.०० ते सायं. ६.०० या वेळेपर्यंत बारनिशी विभाग नगरपरिषद अक्कलकोट कार्यालय येथे नगरपरिषदेच्या विहीत नमुन्यात अर्ज स्वीकारण्यात येतील अथवा comcakkalkot१२३@gmail.com या ई-मेल आयडीवर pdf मध्ये अर्ज सादर करू शकतील. अर्ज नगरपरिषद कार्यालयात उपलब्ध आहे.

२) सदरची पदे ही सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट शहर या नागरी भागासाठी (मुख्याधिकारी नगरपरिषद, अक्कलकोट), मैंदर्गी शहर या भागासाठी (मुख्याधिकारी नगरपरिषद, मैंदर्गी) व दुधनी शहर या नागरी भागातील (मुख्याधिकारी नगरपरिषद, दुधनी) यांचे अधिपत्याखाली केवळ (Covid - १९) ची सेवा देणेकरिता भरण्यात येत आहेत.

३) सदरची पदे तातुरत्या स्वरुपाची असून करार पद्धतीने अटी व शर्तीवर शासनाचे पुढील निर्देशानुसार भरण्यात येणार आहेत.

४) अर्ज स्वीकृतीचा दि. ०४/०८/२०२० रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत राहील.

५) प्राप्त अर्जानुसार इच्छुक उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल. शासनाचे या संबंधाने भविष्यात प्राप्त होणारे निर्देश, सद्यस्थितीत उपलब्ध शासन निर्णय इत्यादी बाबी लक्षात घेऊन करार पद्धतीने तातुरत्या स्वरुपासाठीच्या भरती प्रक्रियेबाबतचा योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

६) कोविड सदृष्यस्थिती तसेच वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त मार्गदर्शक सूचनांचे आधारे कालावधी कमी अथवा जास्त होऊ शकतो.

७) प्रतिक्षाधीन यादी मुलाखत होऊन अंतिम निर्णय झाल्यापासून ७ दिवस लागू राहील व यादीमधील पुढील उमेदवारांस आदेश देण्याचे अधिकार नगरपालिका प्रशासनास राहतील.

८) निवड प्रक्रियेसंबंधीत अधिक चौकशीकरिता श्री. मलीक बागवान, कार्यालय अधीक्षक- नगरपरिषद, अक्कलकोट यांच्याशी संपर्क साधावा. (भ्रमणध्वनी क्र. ८५३०५१८६९९)

९) पात्र उमेदवारांची दिनांक : ०७/०८/२०२० रोजी स. ११.०० वाजता नगरपरिषद अक्कलकोट कार्यालय येथे मुलाखत घेण्यात येईल.

१०) पात्र झालेल्या उमेदवारांची यादी तयार करण्यात येऊन त्यांना नियम व अटीस अधिन राहून तात्काळ सेवा द्यावी लागेल.

११) कामात त्रुटी अथवा हयगय जाणवल्यास कोणतीही नोटीस अथवा समज न देता सेवेतून कमी करण्यात येईल.

१२) निवड झालेल्या उमेदवारांना बंधपत्र करून देणे बंधनकारक राहील.

१३) सदरची नेमणूक ही निव्वळ तातुरती असून कायम सेवेकरिता ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**अटी व शर्ती :-**

१) कमाल वयोमर्यादा ही ७० वर्षापेक्षा अधिक नसावी.

२) इच्छुक उमेदवारांनी / सेवानिवृत्त डॉक्टरांनी अर्जासोबत त्यांच्या संपूर्ण परिचय पत्र, शैक्षणिक पात्रतेसंबंधी सर्व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती नोंदणी प्रमाणपत्र, जन्म तारखेचा पुरावा, सेवा तपशील, दोन पासपोर्ट साईज फोटो जोडणे आवश्यक आहे व मुलाखतीस येताना त्यांच्या मूळ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे.

३) सेवानिवृत्त डॉक्टर उपलब्ध न झाल्यास वैद्यकीय अर्हताधारकांचे अर्जाचा विचार करण्यात येईल.

४) उपरोक्त जाहिरात ही महाराष्ट्र शासनाचे वेळोवेळी प्रसारित होणारे शासन निर्णय, सूचना, आदेशाच्या अधिन राहील. शासनाने दिलेले सुधारित निर्देशानुसार भरती प्रक्रियेत बदल करण्यात येईल.

५) याबाबत सर्वप्रकारचे अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मुख्याधिकारी- नगरपरिषद, अक्कलकोट यांना राहील.

सही/- **(धैर्यशील जाधव)**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, अक्कलकोट**